महाराष्ट्र शासन

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा परिषद वर्धा

**स्वयं सहायता बचत गटांचे लेखे छपाई बाबत**

ग्रामीण भागातील दारिद्र निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पं.दिनदयाळ उपाध्याय अंतोदय योजना (राष्ट्रीय ग्रामीण जीवनन्नोती अभियानाची) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे.या अभियानाची अंमलबजावणी जिल्हा स्थरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षा मार्फत करण्यात येते.जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष-वर्धा अंतर्गत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष वर्धा,सेलू,देवळी व समुद्रपूर या intensive तालुक्यातील स्वयंसहायता **बचत गटांचे लेखे छपाई** करिता प्रिंटींग चा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीकडून ई-मर्यादित निविदा(Limited-tender) प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात येणार आहे.सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रिंटींग व्यवसाय करणाऱ्याकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

१. DSC (Digital Signature Certificate ),
२. https://mahatenders.gov.in या संकेतस्थळ/पोर्टलवर नोंदणीकृत असावा,
३. Shop & Establishment Act अंतर्गत नोंदणीकृत असावी,
४. PAN कार्ड असावे,
५. VAT नोंदणी प्रमाणपत्र,

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक पुरवठादारांनी त्यांच्या https://mahatenders.gov.in वर नोंदणीकृत केलेला login Id तसेच वर नमूद केलेल्या कागदपत्रासह खाली दिलेल्या पत्यावर किंवा dmmuwardha@gmail.com इमेलवर दि.१२/०६/२०१६, दुपारी ३.००वाजेपर्यंत अर्ज करण्यात यावा.कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर निविदा प्रक्रिये मध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक प्रिंटींग व्यवसाय करणाऱ्या कडून कोणतीही निविदा शुल्क व EMD रक्कम घेण्यात येणार नाही.अर्ज सादर करण्याच्या मुदतीत किंवा इतर बाबींमध्ये काही बदल झाल्यास त्याबाबतची सूचना http://www.umed.in किंवा http://www.zpwardha.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
तथा जिल्हा अभियान संचालक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान,
जुनी जिल्हा परिषद इमारत, सुभाष चंद्र बोस चौक,
जिल्हा रुग्णालयाच्या बाजूला, वर्धा